दिनांक २४/१२/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक रामु सोनाजी दाभाडे, वय ३८ वर्ष, पद - कनिष्ठ सहाय्यक, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी १,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपीलोकसेवकाचे नांव हुद्दा | :- | रामु सोनाजी दाभाडे, वय ३८ वर्ष, पद- कनिष्ठ सहाय्यक, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वैजापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या सेवापटाची वेतन पडताळणी करुन देण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पंचायत समिती, लेखा विभाग, वैजापुर, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने शिक्षक असुन लेखा विभाग, पंचायत समिती, वैजापुर येथे लेखा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडुन वेतनपडताळणी संबंधाने दिनांक २१/१२/२०२० ते दिनांक २४/१२/२०२० पावेतो कॅम्प लावण्यात आला होता. त्यावेळी यातील तक्रारदार यांचे वेतन पडताळणीचे काम असल्याने ते रामु दाभाडे, कनिष्ठ लिपीक, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना भेटले असता दाभाडे यांनी तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रु लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी तशी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, रामु दाभाडे, कनिष्ठ सहाय्यक, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक २४/१२/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, रामु सोनाजी दाभाडे, कनिष्ठ सहाय्यक, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे वैजापुर, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. .

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी सुर्यवंशी यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार भिमराज जिवडे, प्रकाश घुगरे, विलास चव्हाण, चालक चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

२४/१२/२०२०

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.